# भारतातील कृषी उत्पादन, उत्पादकता आणि पीक रचनेतील बदलांचा अभ्यास

**श्री.डी. टी. नालेगावकर**
संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
विद्यापीठ औरंगाबाद.

**डॉ.जी. बी. गावंडे**
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,बदनापुर,
जि.जालना.

**प्रस्तावना:-**

कृषी क्षेत्राचे मानवी जीवनातील स्थान पाहता कृषीचे श्रेष्ठत्व निर्विवाद मान्य करावेच लागते. कृषी क्षेत्रामुळे अन्नधान्याचे उत्पादन होऊन उदर निर्वाहाच्या प्रश्नांची सोडवणूक होते. उद्योगधंद्याना कच्चा माल मिळतो. त्यामुळे त्यांच्या भरभराटीस मदत होते.इंधनाची उपलब्धता, इमारतीसाठी लाकूड,विविध आयुर्वेदिक वनस्पती,आरोग्यदायी फळे, हळद व मसाल्यांचे विविध पदार्थ, कापड निर्मितीसाठी कापूस,साखर निर्मितीसाठी ऊस,त्याचप्रमाणे घर सजावटीसाठी विविध आकारांची पाने,धार्मिक व इतर कार्यासाठी सुगंधित फुले व इतर असंख्य उत्पादने शेती क्षेत्रातून मिळतात.शेती क्षेत्रात सहजरित्या काम मिळते. त्यामुळे बेरोजगारी निर्मूलनासाठीही कृषीची मदत होते.प्राचीन काळापासून शेती व्यवसाय हा मानसाचा मूलभूत व्यवसाय राहिल्याचे दिसून येते. मानवाच्या आर्थिक विकासात शेतीचे महत्त्वपूर्ण स्थान बघावयास मिळते. आजही कृषी उत्पादनांना संपूर्ण जगात प्रचंड मागणी आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारातील एक मोठा हिस्सा कृषी उत्पादनांनी व्यापलेला आहे. कृषी उत्पादनांच्या आयात - निर्यातीच्या माध्यमातून जागतीक पातळीवर कृषीक्षेत्र परस्परांजवळ आल्याचे दिसून येते. कृषी उत्पादनांच्या विक्रीच्या माध्यमातून करोडो रुपयांची दैनंदिन उलाढाल होत आहे. यात दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यामुळेच कृषी उत्पादकता वाढीच्या माध्यमातून कृषी उत्पादनांच्या वाढीवर प्रत्येक देशाचा भर असल्याचे दिसून येते.

**संशोधनाची उदिदष्टे :-**

१) प्रमुख पीकांच्या उत्पादनाच्या प्रवृत्तींचा अभ्यास करणे.
२) कृषी उत्पादकतेचा अभ्यास करणे.
३) विविध पीकांखालील क्षेत्राचा अभ्यास करणे.

**कृषी उत्पादनाची प्रवृत्ती:-**

कृषी उत्पादन प्रवृत्तीच्या संदर्भात मागच्या कालखंडातील काही दशकातील कृषी उत्पादन प्रवृत्तीमध्ये सातत्याने वाढ दिसून येते. उत्पादन प्रवृत्तीमध्ये झालेला हा बदल घडवून आणण्यासाठी अनेकानेक घटकांचा सामुहिक परिणाम दिसून येतो. ज्यामध्ये प्रामुख्याने शेती करण्याच्या पारंपरिक पध्दतींऐवजी आधुनिक पध्दतीचा वापर,नैसर्गिक घटकांच्या अनुकूलतेसाठी यशस्वी मानवी प्रयत्न,कृषी संशोधन व तंत्रज्ञान, हरितक्रांती, जलसिंचन सुविधा, उच्च उत्पादन क्षमतेच्या बियाण्यांचा वापर, प्रभावी खते, कीटकनाशके, कृषी क्षेत्रातील शासनाचा सहभाग, माती परिक्षण, विविध कृषी विज्ञान केंद्रे, कृषी महाविद्यालये, कृषी विद्यापीठे यांच्या मदतीने कृषी क्षेत्रातील विविध प्रत्यक्षिके, प्रशिक्षण शिबीरे यांच्याव्दारे कृषी ज्ञानाचा प्रचार - प्रसार, त्याचप्रमाणे रेडीओ, दुरदर्शन तसेच इतर प्रसार माध्यमांच्या माध्यमातून वेळोवेळी कृषी क्षेत्रावर प्रसारित होणारे कार्यक्रम या सर्वांचा परिणाम म्हणून कृषी उत्पादनांत कमालीची वाढ झालेली दिसून येते. ७० च्या दशकात झालेल्या हरितक्रांतीमुळे तर काही पिकांच्या बाबतीत अमुलाग्र बदल झाला.

**भारतातील कृषी उत्पादकता :-**

भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे अनन्यसाधारण महत्व आहे. अशा या क्षेत्रात उत्पादकता कमी असणे ही गोष्ट विकासाच्या दृष्टीने योग्य नाही. योजना काळात भारतीय शेतीच्या उत्पादकतेत काही प्रमानात सुधारणा झाली असली तरी जगातील विकसीत व अल्प विकसीत अशा दोन्ही प्रकारांच्या देशांच्या तुलनेने भारतीय शेतीची उत्पादकता बरीच कमी आहे. उत्पादकता कमी असण्याची जी विविध कारणे आहेत ती पुढीलप्रमाणे.

१)धारण क्षेत्रांचा अकिफातशीर आकार.

२)जमीन धारणा पध्दती.

३)लोकसंख्येचा भार.

४)दैववादी दृष्टीकोन.

५)उत्पादनाचे तंत्र.

६)मान्सूनवरील अवलंबीत्व.

**कृषी उत्पादकता वाढविण्यासाठी उपाययोजना :-**

आज कृषी क्षेत्राचाी उत्पादकता वाढविणे ही काळाची गरज आहे.कारण लोकसंख्येत भरमसाठ वाढ होत असतांना भूमी पुरवठा मात्र स्थिर आहे.त्यामुळे आहे त्याच भूमीत वाढत्या लोकसंख्येला पुरेल एवढे अन्नधान्य मिळणे अपेक्षित आहे. लोकसंख्येचा बहुतांशी हिस्सा कृषी क्षेत्रात समाविष्ट असल्यामुळे कृषी क्षेत्र प्रमुख्याने आर्थिक विकासात मोठा हातभार लावू शकते. ज्यामूळे कृषीची उत्पादकता वाढली पाहिजे.उत्पादकता वाढण्यासाठी काही उपाय महत्वपूर्ण ठरु शकतात.

१) जमीन सुधारणांची कार्यवाही

२) सिंचन

३) सुधारित बी - बियाणे

४) शेतीचे यांत्रिकीकरण

५) पत व बाजारपेठ सोईची तरतूद

६) उत्तम प्रकारच्या खताचा वापर

७) प्रत्यय व विपणन सुविधांचा विकास

८) उत्पादकांना प्रोत्साहन

९) चांगल्या प्रकारचे व्यवस्थापन

१०) कृषी संशोधन

अशाप्रकारे विविध उपायांचा अवलंब करुन कृषी क्षेत्रात उत्पादकता वाढविण्यास प्रोत्साहन देऊन कृषी उत्पादनांची टक्केवारी वाढण्यास मदत होऊ शकते.

**पीक रचना :-**

एखादया प्रदेशात विविध पिकांच्या लागवाडीखाली किती क्षेत्र आहे यावरून त्या प्रदेशातील पीक रचना लक्षात येण्यास मदत होते. पीक रचनेमुळे अन्नधान्याखालील क्षेत्र व बिगर अन्नधान्याखालील क्षेत्राची माहिती मिळते. पीकरचनेचा आकृतिबंध पाहत असतांना वेगवेगळया पिकांचे धारणक्षेत्र कळून येण्यास मदत होते. पीक रचनेमुळे शासकीय धोरणे ठरविण्यास मदत होते.संबंधित पिकांसाठी उत्पादनाचे प्रमाण व त्या तुलनेत मागणीचे प्रमाण पाहुन योग्य त्या दिशेने धोरणे ठरविण्यास मदत होते.गहू,बाजरी, ज्वारी, कडधान्य, ऊस, मका, तसेच इतर पिकांची टक्केवारी काढण्यासाठी पीकरचनेचा उपयोग होतो.

पीकरचनेवर विविध सामाजिक,आर्थिक तसेच नैसर्गिक घटकांचा परिणाम होत असतो.या घटकांमुळे पीक रचनेच्या आलेखात नेहमी चढउतार संभवतो पीकरचनेची प्रादेशिक माहिती समजल्यानंतर त्या संबंधित प्रदेशाची त्या पिकासंदर्भात उत्पादनाची पातळी कळून येण्यास मदत होते.

**संदर्भ सूची** :

१) प्रा.डॉ.दत्तात्रय भुतेकर (२०१५): कृषी अर्थशास्त्र, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.

२) डॉ.जी.एम.झामरे (२०१०): भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र, पिंपळापुरे अ‍ॅण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपुर.

३) राघवेंद्र सिंह (२०१२): भारतीय अर्थव्यवस्था, रजत प्रकाशन, नई दिल्ली.

४) डॉ.विजय कविमंडन (२००२ ): कृषी अर्थशास्त्र श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

५) प्रा.डॉ. दत्तात्रय भुतेकर (२०१६): महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.

६) कै.डॉ.स.श्री.मु.देसाई, डॉ.सौ.निर्मला भालेराव (२०११): भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे.